२. माझा अनुभव

वार्षिक परीक्षा संपली. मी आणि रिमा घरी आलो. घरी पोहोचताच आईने सांगितले, ''उद्या आपल्याला आगगाडीने मामाच्या गावाला जायचे आहे.'' रिमाने आनंदाने उड्या मारल्या. पायांतले पैंजण छुमछुम वाजवत ती घरभर फिरली.

मामाच्या गावाला जाण्यासाठी आम्ही सकाळी निघालो. आगगाडीत बसलो. आगगाडी झुकझुक करत चालली होती. खिडकीत बसलेल्या रिमाचे केस भुरभुर उडत होते. खिडकीतून येणाऱ्या उन्हामुळे तिचे डोळे लुकलुकत होते. तिचा चेहरा प्रसन्न दिसत होता. आई वाचत असलेल्या पुस्तकाची पाने हवेने फडफडत होती. ती वाचनात तल्लीन झाली होती. मी खिडकीतून बाहेर पाहू लागलो. थंडगार वाऱ्याच्या झुळका अंगावर झेलू लागलो.

तेवढ्यात माझे लक्ष माझ्या शेजारी बसलेल्या मावशींकडे गेले. त्यांच्या मांडीवर बसलेले छोटेसे बाळ माझ्याकडे पाहून खुदकन हसले. मी बाळाला मांडीवर घेतले. ते खिडकीतून पळणारी झाडे टुकुटुकु पाहू लागले. पाहता पाहता ते गाढ झोपले.

स्टेशनवर बैलगाडी घेऊन मामा आला होता. रिमाने पळत पळत मामाला गाठले. आम्ही बैलगाडीत बसलो. बैलांच्या गळ्यांतील घुंगूरमाळा खुळखुळ वाजत होत्या. बैलगाडीच्या चाकांचा खडखड आवाज तालात येत होता. आम्ही घराच्या रस्त्याला लागलो. तोवर सायंकाळची वेळ झाली होती. पानांची सळसळ, नदीच्या पाण्याची खळखळ ऐकू येऊ लागली. झाडीतील पक्ष्यांची किलबिल, शेतात चरणाऱ्या गाईंचे हंबरणे, बकऱ्यांचे बेंऽ बेंऽ हे सारे वातावरणात मिसळून गेले होते. शेतातली पिके वाऱ्यावर मंद मंद डुलत होती. मन आनंदाने थुईथुई नाचत होते.

घरी येताच तोंडभर हसून मामीने आमचे स्वागत केले. मामाची मुले राजू अन् चिमी आमचीच वाट पाहत होती. आम्ही एकमेकांना कडकडून भेटलो. आजी हळूहळू चालत, काठी टेकवत टेकवत आमच्याजवळ आली. आम्ही आजीला बिलगलो. तिने आम्हांला जवळ घेतले. आमच्या डोक्यावरून, तोंडावरून हात फिरवला. तिच्या हाताचा थरथरणारा स्पर्श खूप प्रेमळ अन् बोलका होता. आम्हांला खूप गहिवरून आले.

दुसऱ्या दिवसापासून नुसती धमाल. विहिरीवर पोहायला जाणे, शेतात बागडणे, आंब्याच्या झाडावर चढून कैऱ्या, पाडाचा आंबा तोडून खाणे, बैलगाडीतून मामाबरोबर फेरफटका मारणे, आज शेतावर, तर उद्या आमराईत मामाबरोबर फिरायला जाणे, रोज मजाच मजा.

आमची सुट्टी कधी संपली, ते आम्हांला समजलेच नाही. आम्ही परत गावी आलो.

शब्दार्थ : **लुकलुकणे** – चमकणे. **तल्लीन होणे** – दंग होणे, गुंग होणे. **कडकडून भेटणे** – प्रेमाने मिठी मारणे. **बिलगणे** – प्रेमाने जवळ येणे. **गहिवरून येणे** – मन भरून येणे. **धमाल** – मजा. **पाडाचा आंबा** – अर्धवट पिकलेला आंबा. **आमराई** – आंब्याच्या झाडांची बाग.

स्वाध्याय

प्र. १. का ते लिहा.

(अ) रिमाने आनंदाने उड्या मारल्या.

(आ) मुलाने बाळाला मांडीवर घेतले.

(इ) मुलाचे मन आनंदाने थुईथुई नाचू लागले.

(ई) मुलांना गहिवरून आले.

प्र. २. 'सुट्टी कधी संपली, ते आम्हांला समजलेच नाही.' असे मुलाला का वाटले? तुमच्या शब्दांत लिहा.

प्र. ३. वाचा. सांगा. लिहा.

(अ) नादमय शब्द

उदा., छुमछुम, झुकझुक.

प्र. ४. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.

(अ) वारा (आ) तोंड (इ) रस्ता (ई) आई (उ) शेत

प्र. ५. जोड्या जुळवा.

'अ' गट	'ब' गट
(अ) आगगाडी	(१) खुळखुळ
(आ) पैंजण	(२) खडखड
(इ) घुंगूरमाळा	(३) झुकझुक
(ई) बैलगाडी	(४) खळखळ
(उ) पाणी	(५) छुमछुम

शिक्षकांसाठी : विद्यार्थ्यांना त्यांनी अनुभवलेल्या विविध प्रसंगांचे कथन करण्यास प्रवृत्त करावे, प्रोत्साहन द्यावे.

प्र. ६. 'गाईचे हंबरणे' तसे खालील पशुपक्ष्यांचे आवाजदर्शक शब्द लिहा.

(अ) बकरी–
(आ) वाघ–
(इ) बेडूक–
(ई) कुत्रा–
(उ) मांजर–
(ऊ) मोर–

प्र. ७. खालील वाक्प्रचारांचा वाक्यांत उपयोग करा.

(अ) खुदकन हसणे.
(आ) गाढ झोपणे.
(इ) कडकडून भेटणे.
(ई) टुकुटुकु पाहणे.
(उ) आनंदाने थुईथुई नाचणे.
(ऊ) गहिवरून येणे.

प्र. ८. 'बाजारहाट' यासारखे आणखी काही जोडशब्द लिहा.

प्र. ९. तुम्ही एखादे चांगले काम केले आहे, त्या प्रसंगाचे अनुभवलेखन करा.

प्र. १०.तुमच्या घरातील व्यक्तींबरोबर सुट्टीच्या दिवशी तुम्ही कशी मजा करता ते लिहा.

प्र. ११.खालील शब्दांसारखे दोन–दोन शब्द लिहा.

(अ) सळसळ (आ) भुरभुर (इ) लुकलुक (ई) खडखड

प्र. १२.हे शब्द असेच लिहा.

उद्या, उन्हाने, तल्लीन, स्टेशन, स्वागत, वाऱ्यांच्या, तेवढ्यात, येणाऱ्या, रस्त्याला, कोंबड्यांचा, स्पर्श, प्रेमळ, दुसऱ्या, कैऱ्या, सुट्टी, आंब्याच्या.

प्र. १३ खालील शब्द आपण कधी वापरतो?

कृपया, माफ करा, आभारी आहे.

- **आपण एका वस्तूबद्दल बोलू लागलो, की त्यास एकवचन म्हणतो आणि अनेकांबद्दल बोलू लागलो, की त्यास अनेकवचन म्हणतो.** उदा., एक झाड – अनेक झाडे.

खालील शब्दांच्या जोड्या वाचा व समजून घ्या.

अ.क्र	एकवचन	अनेकवचन	अ.क्र	एकवचन	अनेकवचन
(१)	छत्री	छत्र्या	(४)	अंगठी	अंगठ्या
(२)	डोळा	डोळे	(५)	बांगडी	बांगड्या
(३)	पाटी	पाट्या	(६)	पुस्तक	पुस्तके

- **खालील वाक्यांतील नामांना अधोरेखित करा.**

(अ) बाबांचा सदरा उसवला.
(आ) सुमनने गुलाबाचे रोपटे लावले.
(इ) पाकिटात पैसे नव्हते.
(ई) मुले बागेत खेळत होती.
(उ) समोरून बैल येत होता.
(ऊ) सरिता व फरिदा चांगल्या मैत्रिणी आहेत.
(ए) पंकजने परीक्षेत पहिला नंबर मिळवला.

8SIULI

सुविचार

मन प्रसन्न असेल, तर कामात उत्साह येतो व काम झटपट होते.

मनापासून व एकाग्रतेने काम केले, की जीवनात यश हमखास मिळते.

चांगले पेराल तर चांगले उगवेल हे विसरता कामा नये, कारण ते जीवनाचे सूत्र आहे.

अधिक मित्र हवे असतील, तर दुसऱ्यांच्या गुणांचे मनापासून कौतुक करा.

सूचनाफलक

तिकिटाएवढेच पैसे वाहकास द्यावे, तिकीट मागून घ्यावे.

स्त्रिया व अपंग यांच्यासाठी राखीव ठेवलेल्या जागेवर बसू नये.

स्पीड ब्रेकरकडे करू नका दुर्लक्ष, अपघात होऊ नये, म्हणून द्या सदैव लक्ष.

वाहन चालवताना मोबाईलचा वापर नेहमी टाळा.

वाचा.

काल सकाळी सहाच्या सुमारास मी बाबांबरोबर फिरायला गेलो होतो. पूर्वेकडून सूर्य वर येत होता. सूर्याची ती लालसर पिवळी किरणे किती वेगळी व छान दिसत होती! त्यांच्याकडे मी वारंवार पाहत होतो. सकाळचा तो गारवा किती छान वाटत होता. रस्त्यातल्या झाडांवर वेगवेगळे पक्षी बसलेले होते. त्यांचे वेगवेगळे आवाज कानांवर पडत होते. बाबा खूपच भरभर चालत होते. चालता चालता मी मात्र दमलो होतो. बाबांना मी थांबायला सांगितले. आम्ही एका ठिकाणी बसलो. बाबा सकाळच्या मोकळ्या व शुद्ध हवेविषयी मला सांगत होते. खरंच त्या शुद्ध व मोकळ्या हवेचा अनुभव मला येत होता. मला प्रसन्न व ताजेतवाने झाल्यासारखे वाटत होते. रोज सकाळी लवकर उठण्याचा आणि फिरायला जाण्याचा अनुभव तुम्हीपण घ्या. तुम्हांलाही छान वाटेल.

शिक्षकांसाठी : विद्यार्थ्यांकडून वेगवेगळ्या सामाजिक समस्यांवर आधारित घोषवाक्ये, सूचनाफलक, सुविचार तयार करून वर्गात तसेच शाळेच्या परिसरात लावावे. विद्यार्थ्यांकडून उताऱ्याचे अनुलेखन करून घ्यावे.